# बालशिक्षण महर्षी प्रा. रमेश पानसे

लेखक: विवेक सावंत, चीफ मेंटॉर, एमकेसीएल (महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित);
९८२२० ५२९१४; mentor@mkcl.org

समाजाच्या सर्वात वंचित घटकामध्ये दर्जेदार बालशिक्षण रुजविण्याचे क्रांतीकारक कार्य महाराष्ट्रामध्ये गेल्या शतकात झाले. श्रीमती ताराबाई मोडक आणि श्रीमती अनुताई वाघ या दोघींचे अन्त्योदयी जीवनदृष्टीवर अपार श्रद्धा असलेले प्रतिभाशाली आणि कर्मशील नेतृत्व या कार्याला लाभले. त्या दोघींनी कोसबाडच्या दुर्गम आदिवासी भागात कायमचे वास्तव्य करून स्थानिक परिसर व त्यातीलच उपलब्ध वस्तूंपासून तयार केलेली शैक्षणिक साधने वापरून आदिवासी मुलांचे शिक्षण आनंददायी कसे होईल यासाठी अनेक दिशादर्शक प्रयोग केले. त्यामुळे जन्मानंतरची पहिली सहा वर्षे मुलांच्या व समाजाच्या भविष्यातील सर्वांगीण विकासासाठी किती महत्वाची असतात आणि त्या वयातले शिक्षण किती संवेदनशीलपणे व विचारपूर्वक करावे लागते याविषयी समाजात व्यापक जागृती झाली. बक्मिन्सटर फ्यूलर हा विख्यात जर्मन शास्त्रज्ञ म्हणत असे की ‘सर्व मुले जन्मत: कुशाग्र बुद्धिमत्तेची असतात, आपण त्यांच्या वयाची पहिली सहा वर्षे त्यांना बिनडोक बनवून सोडण्यात खर्ची घालतो!’ प्रेमळ पण अज्ञानी व परिणामत: बालविकासद्रोही पालक व समाज यांच्याबद्द्लचे हे जळजळीत सत्य. ताराबाई व अनुताई यांच्या कार्याने घराघरात पसरलेल्या या अज्ञानाचा अंध:कार नष्ट व्हायला सुरुवात झाली. महाराष्ट्रात बालक मुक्तीची जणू पहाट झाली. कोसबाडपासून स्फूर्ती घेऊन महाराष्ट्रात अक्षरश: हजारो ‘बालकमंदिरे’ गावोगावी सुरु झाली, आजही होत आहेत. ताराबाई व अनुताई यांच्या कार्यामुळे सार्वत्रिक बालशिक्षणाच्या मूलभूत परिवर्तनाचा शास्त्रशुध्द, वैचारिक, सामाजिक व सांस्कृतिक पाया घातला गेला. साऱ्या महाराष्ट्राला व देशाला पुढे मार्गदर्शक ठरलेल्या शास्त्रीय बालशिक्षणाच्या या नवप्रवर्तनासाठी त्यांनी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले.

त्या समृद्ध पायावर प्रा. रमेश पानसेसरांनी तितक्याच समर्पित भावनेने व विलक्षण कल्पकतेने बालशिक्षणाच्या राज्यव्यापी चळवळीची इमारत उभी केली. ‘ग्राममंगल’ व ‘महाराष्ट्र बालशिक्षण परिषद’ यांच्याद्वारे सरांनी महाराष्ट्रात शास्त्रीय व दर्जेदार बालशिक्षणाचा केवळ संख्यात्मक विस्तार केला असे नव्हे तर त्याच्या गुणात्मक परिवर्तनासाठी, ते कालसुसंगत ठेवण्यासाठी सातत्याने वैचारिक, संशोधनात्मक आणि संघटनात्मक योगदान दिले. या क्षेत्राला भविष्यवेधी नेतृत्वही दिले. ताराबाई व अनुताई यांच्या उत्तरदायित्वाला पानसेसरांच्या रूपाने खराखुरा कर्तबगार उत्तराधिकारी लाभला. या क्षेत्रात त्यांनी आपली प्रतिभा, प्रज्ञा आणि प्रयत्न पणाला लावून परंपरा आणि नवता यांचा सुरेख संगम

घडवून आणला. आपल्या दोन वलयांकित पूर्वसुरींच्या पश्चातही बालशिक्षण क्षेत्रातील टवटवीतपणा आणि चैतन्य कायम राखले. आपल्या विलक्षण बुद्धिमत्तेच्या आणि कर्तृत्वाच्या जोरावर पानसेसर अधिक आकर्षक अशा इतर अनेक कार्यक्षेत्रात आपला अमीट ठसा उमटवू शकले असते आणि लौकिकार्थाने अधिक सुखकर असे ऐहिक जीवन जगू शकले असते. पण तो मोह त्यांनी टाळला. 'बालशिक्षण हेच तुझे लाईफ-मिशन आहे' असे सांगणाऱ्या आपल्या 'आतल्या आवाजा'ला त्यांनी संवेदनशीलपणे प्रतिसाद दिला. हे बालशिक्षण क्षेत्राचे आणि महाराष्ट्राचे भाग्य. उत्साही आणि निगर्वी, मिश्किल, रसिक आणि संवादकुशल अशा त्यांच्या प्रसन्न व्यक्तिमत्वामुळे तसेच त्यांच्या व्यासंगी, विवेकनिष्ठ, ध्येयवादी, धाडसी, निग्रही आणि लोकसंग्रही वृत्तीमुळे गेली चार दशके त्यांच्या समर्थ नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील बालशिक्षण कार्याची व्याप्ती आणि खोली वृद्धिंगत होत राहिली आहे.

प्राण्यांच्या अभ्यासावर आधारलेले व तसेच्या तसे माणसांच्या मुलांना लागू केले गेलेले वर्तनवादी शिक्षण हे शिक्षणच नव्हे ही स्पष्ट भूमिका सरांनी फार पूर्वीपासून घेतली. सर्कशीतील प्रशिक्षित प्राण्यांप्रमाणे दिलेल्या बाह्य संवेदनेला अपेक्षित प्रतिसाद देता आला म्हणजे मुले 'शिकली' असे समजणे कालबाह्य ठरले आहे हे वैज्ञानिक सत्य त्यांनी हिरिरीने मांडले. बाह्य संवेदना व त्यांना देण्याच्या प्रतिसादांच्या निवडीचे जे स्वातंत्र्य माणसाला लाभले आहे त्या निवडीच्या स्वातंत्र्याचा निरंतर विकास म्हणजे शिक्षण. त्यामुळे मुलांचे शिक्षण पुस्तकी असता कामा नये. त्यात बाह्य संवेदनांचे वैचित्र्य असायला हवे. त्या वैचित्र्यातून निवड करण्याचे व निवडलेल्या संवेदनांना सर्जनशील प्रतिसाद देण्याचे पुरेपूर स्वातंत्र्य त्यात असायला हवे. म्हणून शिक्षण अनुभवाधारित असले पाहिजे. ते अनुभव कृतीजन्य व कृतीपूर्ण असले पाहिजेत, कारण मुले 'करून शिकतात' आणि 'त्यांना करून शिकायला आवडते'. 'कृतीनिष्ठ अनुभवांची रेलचेल' ही यशस्वी बालशिक्षणाची पूर्वअट आहे. अनुभवांमधून मुलांना ज्ञाननिर्मितीची आस लागते. आणि ही आस भागविण्यासाठी 'नवनवीन आव्हानांचे सातत्य' त्यांना हवे असते. गृहपाठ, घोकंपट्टी, शारीरिक हालचालीस निर्बंध, लादलेली शिस्त, शिक्षा, तणावपूर्ण परीक्षा, स्पर्धा, इतर मुलांशी तुलना यांचा अभाव आणि स्वच्छ, मोकळे, आनंदी वातावरण यातून मिळणारी भावनिक सुरक्षितता मुलांच्या ज्ञाननिर्मितीसाठी अत्यावश्यक असते. अशा पोषक वातावरणात मुले आपल्या आजूबाजूच्या घटनांचा, भौतिक जगाचा, मानवी पर्यावरणाचा स्वनिर्मित अर्थ लावण्याचा खटाटोप करतात. अर्थात, आपली आपण ज्ञानरचना करतात. हा क्रांतीकारक विचार पानसेसरांनी वर्षानुवर्षे अपार कष्ट करून हजारो शिक्षकांमध्ये हृदयपरिवर्तनाने रुजवला.

त्याच त्या कामांची जशीच्या तशी पुनरावृती करणे,  स्वत:ची बुद्धी न वापरता हुकुमाप्रमाणे यंत्रवत कामे करणे या आशयाचे शिक्षण यंत्रोद्योगप्रधान अर्थव्यवस्थेला कामगार पुरविण्यासाठी अस्तित्वात आले. ज्ञानप्रधान अवस्थेत हे शिक्षण कालबाह्य ठरले आहे. तसे शिकविणारी शाळा ही बंदिशाळा आहे, हे

सरांनी पटवून दिले. त्यामुळे घोकंपट्टी व पोपटपंचीवर बेतलेल्या व आताच्या ज्ञानाधिष्ठित जगात कुचकामी ठरलेल्या साचेबंद शिक्षणपद्धतीतून हजारो मुलांची सुटका झाली. त्यांना माणूस म्हणून ज्या खास नैसर्गिक बौद्धिक क्षमता लाभल्या आहेत त्यांचा विकास साधता आला. स्वतंत्र विचार, स्वतंत्र अभिव्यक्ती व सर्जनशील नवनिर्मिती एकट्याने व गटाने करण्याच्या विपुल संधी त्यांना मिळाल्या. एकोत्तरी व अपेक्षित प्रश्नांना अपेक्षित वेळात अपेक्षित उत्तरे देऊन अपेक्षित गुण मिळवता येतील, पण आता गूगल ते अधिक वेगाने करते. अनपेक्षित व मुक्तोत्तरी प्रश्नांना कल्पकतेने नवनवीन उत्तरे शोधण्याचा सराव आता शाळेत होणे अपेक्षित आहे. तशाच मुलांचा जगात टिकाव लागणार आहे. पानसेसरांच्या प्रेरणेने बदललेल्या शाळांत तसे शिक्षण मुलांना मिळाले. तेथील मुले कुणालाही निर्भिडपणे प्रश्न विचारायला मागेपुढे पहात नाहीत. गटचर्चेत कळीचे मुद्दे उपस्थित करतात. मोठ्यांच्या किंवा पुस्तकातल्या विधानांची मार्मिक चिकित्सा करतात. आपले मत आत्मविश्वासाने मांडतात. माहितीची ओझी वाहण्याऐवजी स्वत:हून ज्ञानरचना करण्याचा रियाझ करतात. ती मुले अशी घडताना पहाणे हा त्यांच्या आणि देशाच्या भविष्याविषयी आपल्याला आश्वस्त करणारा अनुभव असतो.  पानसेसरांचे हे प्रारूप देशात सर्वत्र व्हायरल व्हायला हवे. अर्थात ते काम सरांचे नाही. एडिसनने प्रत्येक घरात विद्युत दिवा लावावा अशी अपेक्षा कशी करता येईल? बहुअंगांनी व्यक्त होता होता ‘स्व’चा शोध घेण्याच्या विपुल संधी देते ती शाळा आणि अशा संधी नाकारते ती बंदिशाळा! गावोगावच्या बंदिशाळांमधील आपली कोट्यावधी मुले अशा जादुई ‘संधीशाळां’च्या प्रतीक्षेत आहेत.

पानसेसरांनी केवळ स्वत:च बालशिक्षणासाठी आयुष्यभर योगदान दिले असे नाही. आपले आयुष्य या उद्दिष्टासाठी समर्पित करणारे तितकेच तळमळीचे कार्यकर्तेसुद्धा त्यांनी सतत घडवले आणि चळवळीशी जोडले. बालविकासकेंद्री शिक्षण व समाज निर्माण करण्यासाठी झटणाऱ्या शेकडो कार्यकर्त्यांची फळी महाराष्ट्रात निर्माण झाली. शास्त्रीय बालशिक्षणाशी बांधिलकी मानणाऱ्या त्या सर्वांना पानसेसर प्रेरणास्थान वाटतात आणि हक्काचे आश्रयस्थानही. बालशिक्षणात आपण नवीन काही केले की त्यावर पानसेसरांच्या मान्यतेची मोहोर असावी, त्यांच्या शाबासकीची थाप आपल्या पाठीवर पडावी असे या चळवळीतील सगळ्यांना वाटते. ‘बालशिक्षकांच्या मुक्त विद्यापीठाचे’ ते अनभिषिक्त कुलगुरू आहेत! बालशिक्षण परिषदेच्या वार्षिक अधिवेशनात चांद्यापासून बांद्यापर्यंतचे अनेक प्रयोगशील कार्यकर्ते भेटले की सरांच्या वैचारिक नेतृत्वाची व संघटन कौशल्याची प्रचीती येते. पानसेसरांचे झपाटलेपण किती संसर्गजन्य आहे हे त्यांच्याबरोबर काम करणाऱ्या या परिषदेतील पुढील दोन पिढ्यातील कार्यकर्त्यांच्या झपाटलेपणावरून सहज लक्षात येते. पानसेसर अशा गावोगावच्या, जिवाभावाच्या असंख्य शिष्यांबरोबरच्या आणि चिमुकल्यांबरोबरच्या सहनिर्मितीत आजही आपल्या लाईफ-मिशनमध्ये दंग आहेत. हेच त्यांच्या कृतार्थ जीवनाचे रहस्य आहे. अमृत महोत्सवानंतर सहस्त्रचंद्रदर्शनाच्या उंबरठ्यावर यापेक्षा सरस अमृतानुभव आणखी कुठला असू शकतो?

ताराबाई आणि अनुताई या वटवृक्षांच्या छायेत पानसेसर खुरटले नाहीत आणि पानसे सरांच्या वृक्षछायेत ग्राममंगल किंवा बालशिक्षण परिषदेच्या कार्यकर्त्यांच्या पिढ्याही खुरटल्या नाहीत. स्वतंत्र वृत्तीने काम करणारे व प्रसंगी सरांशी मनमोकळा सैद्धांतिक वाद घालणारे शिष्यसदृश कार्यकर्ते पाहिले की आपल्याला आश्चर्य वाटते आणि मग लक्षात येते की ही तीन ज्ञानी माणसे वटवृक्ष वगैरे नाहीतच. त्यांनी बालशिक्षणाची सावली निर्माण न करता त्याचे आकाश निर्माण केले आहे! त्या आकाशात अनेक पक्षी मुक्तविहार करत आहेत. 'पानसे स्कूल ऑफ थॉट' मध्ये अनुकरण नाही, अनुसरण नाही, तर अनुसर्जन व नवसर्जन आहे. पानसेसरांसारखा निखळ शिक्षणतज्ञ आणि स्वत:पेक्षा स्वत:च्या मिशनवर, त्या मिशनच्या अर्थपूर्ण व दीर्घकालीन सातत्यावर प्रेम असलेला नेताच आपल्या अनुयायांना असे घडवू शकतो आणि घडू देऊ शकतो. 'ट्रू लीडर्स बिगेट लीडरशिप अराउंड देमसेल्व्स'!

शिक्षणाची मुख्यप्रवाही चर्चा किंवा धोरणनिश्चिती पूर्वी सामान्यत: प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणापुरती मर्यादित असे. त्यात बालशिक्षण दुर्लक्षित असे. पण बालशिक्षणाच्या भरभक्कम पायाशिवाय वरचा इमला कुचकामी आहे हे पानसेसरांच्या अथक प्रयत्नांमुळे महाराष्ट्रातील धोरणकर्त्यांना पटले. बालशिक्षण क्षेत्रात शासन आणि समाज जी गुंतवणूक करेल तिच्यावरील आर्थिक परताव्याची टक्केवारी उच्चशिक्षण-गुंतवणुकीवरील परताव्यापेक्षा खूप जास्त असते; दोन अंकी असते; दर्जेदार बालशिक्षणात गुंतवणूक केल्यास गुन्हेगारी, दहशतवाद प्रतिबंधन, दमनयंत्रणा, तुरुंग, इ. अनेक अनाठायी शासकीय खर्चांमध्ये लक्षणीय घट होते; हे जगन्मान्य अर्थशात्रीय सिद्धांत पानसेसरांच्या आग्रही युक्तीवादामुळेच मुख्यप्रवाही चर्चेत मूळ धरत आहेत.

अशीच भूमिका त्यांनी खासगीकरण-उदारीकरण-जागतिकीकरण(खाउजा) या 'त्रि-कूट' नीतीच्या प्रचंड प्रभावाखाली गेली तीन दशके बधीर झालेल्या समाजाला आणि शासनाला जागे करण्यासाठी बजावली. 'मराठी मुलांना मराठी माध्यमातूनच शिक्षण देणे शास्त्रीयदृष्ट्या वैध, उचित आणि हितकर आहे व ते इंग्रजी माध्यमातून देणे अशास्त्रीय व हानिकारक आहे' हे त्यांनी वैज्ञानिक आधारावर ठणकावून सांगितले. कोट्यावधी मुलांना मातृभाषेतून रचनावादी शिक्षण मिळाल्याशिवाय भारत ज्ञानयुगात झेप घेऊ शकणार नाही, 'आत्मनिर्भर' होऊ शकणार नाही, जगावर आपली छाप पाडू शकणार नाही. 'इंग्रजी शिकणे' आणि 'इंग्रजीतून शिकणे' या दोन गोष्टींची गल्लत करता कामा नये हे त्यांच्या परीने महाराष्ट्राला पटवून देण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला. मराठी माध्यमाच्या शाळा सरकारने बंद पाडू नयेत यासाठी रस्त्यावर बसून सत्याग्रह करण्यासही त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. याबाबतीत "जागल्या"ची भूमिका पार पडण्यासाठी पानसेसरांनी प्रसंगी स्वत:च्या तब्येतीची पर्वा न करता घेतलेला पुढाकार, त्यांची नि:स्पृहता आणि निर्भयता अनुकरणीय आहे. राजसत्ता, धनसत्ता, सांस्कृतिक सत्ता

आणि अभिजनवर्चस्ववादी ज्ञानसत्ता या विषयावर एकवटल्या असताना हा एकटा माणूस धैर्याने व वैज्ञानिक सिद्धांतांच्या आधारे त्या सर्वांविरुद्ध निर्भयपणे उभा राहतो तेव्हा जॉन एफ. केनेडींच्या 'प्रोफाईल्स इन करेज' या ग्रंथामधील अख्ख्या अमेरिकेचा विरोध अंगावर घेऊन आपली तात्विक भूमिका ठामपणे मांडणाऱ्या धैर्यशील सिनेटर्सची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. मुलांच्या आणि समाजाच्या हितासाठी धैर्याने उभा राहणारा असा एक विचारवंत महाराष्ट्रात आहे हीच आपल्याला केवढा धीर देणारी गोष्ट आहे. महात्मा  गांधींच्या शब्दात सांगायचे तर पानसेसर हे "सत्याग्रही सायंटिस्ट" आहेत.

सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी मराठी माध्यमातून मोफत शिक्षण देणाऱ्या शासकीय शाळा बंद होऊ नयेत यासाठी गळेकाढूपणाने टीका करत न बसता तेथे गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे म्हणून पानसेसर व त्यांच्या टीमने शासनाला सहकार्य व मार्गदर्शन करत मोठ्या प्रमाणावर शिक्षकांना प्रशिक्षित केले आणि त्यांना विश्वासात घेऊन स्फूर्ती दिली. अर्थातच या शाळातील गळती तर थांबलीच पण गावातील पालकांचा या शाळांकडे बघण्याचा दृष्टीकोन पार पालटून गेला, त्यांनी आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या खासगी शाळांतून काढून पुन्हा जिल्हा परिषदेच्या मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये घातले, त्यामुळे या शाळांच्या पटसंख्येत लक्षणीय वाढ झाली. बरेच शिक्षक-शिक्षिका व गटशिक्षणाधिकारी 'हिरो' झाले, त्यांचा आत्मविश्वास दुणावला व या प्रशिक्षणाला आणि अस्तंगत होऊ घातलेल्या मराठी शाळांना नवसंजीवनी मिळाली!

स्वत:चे असामान्यत्व झाकून ठेवत सर्वसामान्य शिक्षकांकडून असामान्य अशा सामुहिक कृती सातत्याने करवून घेणे व त्याद्वारे शिक्षणातील परिवर्तन प्रत्यक्षात उतरविणे हे पानसेसरांचे खास वैशिष्ट्य. ज्या शिक्षक वर्गाबद्दल समाजात सतत तुच्छतेची भावना असते, शिक्षक आळशी आहेत, कामचुकार आहेत, इ. टीका केली जाते अशाच शिक्षकांकडे पानसेसर अपराधी म्हणून न बघता नव्या ज्ञानापासून वंचित असे निरपराध अज्ञानी म्हणून बघतात व त्यांच्या योग्य प्रशिक्षणासाठी पुढाकार घेतात. पुढची किमया शिक्षक घडवतात. सिंहाला बघावे वनात, हत्तीला बघावे रानात तसे पानसेसरांना बघावे शिक्षक-प्रशिक्षणात! आशय, पर्यावरण आणि प्रक्रिया या बालशिक्षणाच्या तीनही परिमाणांमध्ये आणि त्यांच्या बेमालूम मिलाफामध्ये पानसेसरांनी जे परिवर्तन घडवून आणले त्यामुळे बालशिक्षण केवळ मुलांसाठीच आनंददायी न राहता शिक्षकांसाठी आणि पालकांसाठीही आनंददायी झाले आहे! पानसेसरांच्या ध्यासपर्वाचे हे परमोच्च शिखर आहे. माझी आणि पानसेसरांची पहिली भेट त्यांच्या 'मूल कसे शिकते?' या विषयावरील पालक-प्रशिक्षण वर्गातच झाली. कर्मयोगी गुरूच्या शोधात निघालेल्या विनोबांची गांधीजींशी पहिली भेट गांधीजी आश्रमातील रसोड्यात भाजी चिरण्याच्या कर्मात मग्न असताना झाली

आणि विनोबा गांधीजींच्या कायमचे प्रेमात पडले. माझे काहीसे तसेच झाले. मोठ्या माणसांचे पहिले दर्शन ती माणसे त्यांच्या मिशनमध्ये रममाण असलेल्या स्थितीत होणे ही एक पर्वणीच असते!

गेली पंधरा वर्षे पानसेसरांनी शिक्षकांमध्ये व पालकांमध्ये मुलांच्या बहुविध बुद्धिमत्तांचा विकास आणि ज्ञानरचनावादी शिक्षणाच्या प्रचार-प्रसारासाठी जागृतीचे जे प्रचंड कार्य केले त्याला अक्षरश: तोड नाही. पानसेसरांनी वेळोवेळी केलेल्या सुबोध मांडणीमुळेच रचनावाद महाराष्ट्रातील बऱ्याचशा शिक्षकांना, संस्था-चालकांना, शिक्षणाधिकाऱ्यांना आणि पालकांनाही समजला, उमजला, पटला आणि भावलाही, आणि म्हणूनच लक्षावधी मुलांच्या शिक्षणात तो आज उतरला आहे. अन्यथा रचनावाद हा पाठ्यपुस्तकांच्या प्रस्तावनेत केवळ शब्दरूपे उरला असता. तुटपुंजी साधनसामुग्री असलेल्या शाळेतही दर्जेदार रचनावादी शिक्षण प्रभावीपणे आमलात आणता येते हे पानसेसरांनी आदिवासी, ग्रामीण, निमशहरी आणि शहरी भागातील शाळांमधील असंख्य प्रयोगांच्या सहाय्याने दाखवून दिले. उच्चशिक्षण क्षेत्राला पानसेसरांसारखा ‘रचनावादी इव्हँजलिस्ट’ न लाभल्याने सर्वसाधारण प्राध्यापकांना अद्याप रचनावादाची प्राथमिक माहितीही नाही! त्यामुळे रचनावादी उच्चशिक्षण हे प्रदीर्घ काळापर्यंत स्वप्नच राहणार आहे.

जेव्हा व्यवस्था परिवर्तनाला विरोध करेल तेव्हा तिची निष्ठूर आलोचना करून बंडखोरवृत्तीने तिच्याशी खुलेआम संघर्ष कसा करावा, त्यासाठी सार्वत्रिक उपेक्षेची जोखीम कशी पत्करावी, आपल्या भूमिकेविषयी समाजात वैचारिक जागृती कशी करावी, त्यात प्रसार माध्यमांची साथ कशी मिळवावी आणि जेव्हा तीच व्यवस्था परिवर्तनाला अगदी सौम्य का होईना पण सकारात्मक प्रतिसाद देते तेव्हा समाजाच्या हितासाठी चार पावले स्वत:हून पुढे जावून तिच्याशी मनापासून सर्जनशील सहकार्य कसे करावे या दोन्हींचा मूर्तीमंत वस्तुपाठ म्हणजे पानसेसर. यादृष्टीने पालघर जिल्ह्यातील चार आदिवासीबहुल तालुक्यांतील सुमारे २५०० अंगणवाड्यांचे पानसेसरांच्या मार्गदर्शनाखाली घडून आलेले परिवर्तन ही तर एक थक्क करणारी कहाणी आहे. भारतात कुठल्याही क्षेत्रात परिवर्तन अशक्य आहे अशा निराशावादी निष्कर्षाप्रत आलेल्या कुणालाही प्रचंड स्फूर्ती आणि ऊर्जा मिळेल अशी ती सत्यकथा आहे. अंगणवाड्यांमध्ये सहा वर्षाखालील मुलांचे पोषण आणि आरोग्यरक्षण याबरोबरच शिक्षणही किती आनंददायी आणि प्रभावी होऊ शकते आणि त्यामुळे अंगणवाडीतील ताईंना आपले अस्तित्व कसे अर्थपूर्ण वाटू लागते, ताईंनी मुलांना त्यांच्या घरून धरून गोळा करत आणण्याऐवजी पालक आणि मुलेच अंगणवाडीच्या दारापाशी रोज ताईंची वाट कशी बघत असतात हे पाहिले की आपण आश्चर्यचकित होतो. “मूल कसे शिकते?”, “स्वत: शिकणे ही मुलांसाठी नैसर्गिक आणि म्हणून आनंददायक गोष्ट कशी आहे?” इ. गोष्टी वैज्ञानिकांनी सिद्ध करून दाखविल्या आहेत हे खरे आहे. पण अल्पशिक्षित व अत्यल्प वेतन मिळणाऱ्या अंगणवाडी ताईला त्या प्रेमाने समजावून सांगता येतात, तिला

साऱ्या अडचणींवर मात करून त्या प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रेरित करता येते आणि त्या प्रेरणेतून सीएसआरच्या मदतीने शासकीय व्यवस्थेच्या कक्षेत राहूनही प्रचंड मोठ्या प्रमाणावरील अंगणवाड्यांमधील मुलांचे जीवन हसत-खेळत शिकण्याच्या अनुभवाने समृद्ध करता येते, ते आंनदाने ओतप्रोत भरून जाते हे अडीच हजार अंगणवाड्यांमध्ये एकाच वेळी सिद्ध करणे ही पानसेसर आणि त्यांच्या टीमची आपल्याला थक्क करून टाकणारी ज्ञानाधिष्ठित किमया आहे! पानसेसरांच्या प्रेरणेने अशक्य कोटीतून शक्य कोटीत अवतरलेले अंगणवाडी ताई आणि सेविकांचे हे प्रचंड कार्य पाहिले की अंत:करण भरून येते आणि 'म्हाताऱ्याने डोंगर हलवला' असेच म्हणावेसे वाटते!

'अंगणवाडीतील उपस्थिती, पोषण आणि आरोग्यरक्षण सहजसाध्य करायचे असेल तर अंगणवाडीत आनंददायी शिक्षणाचा परिपोष केला पाहिजे' ही या प्रयोगाची सैद्धांतिक निष्पत्ती आहे. 'आनंददायी शिक्षण ही अंगणवाडी संकल्पनेच्या यशाची अनिवार्य अशी पूर्वअट आहे' हा शोध ही कोट्यवधी मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी पानसेसरांनी दिलेली अपूर्व दिशा आणि अमूल्य देणगी आहे. माणसाच्या मुलांच्या आनंदाचा स्रोत त्यांच्या पोटातून नव्हे तर त्यांच्या मेंदूतून उगम पावतो हा शोध घराघरातील पालकांमध्ये पानसेसरांमुळे पोहोचला आहे!

खासगी क्षेत्र, शासकीय क्षेत्र आणि सामाजिक क्षेत्र या तीनही क्षेत्रांचे अंगभूत दोष शिताफीने दूर ठेवून त्या क्षेत्रांच्या परस्परपूरक आणि समाजाला श्रेयस्कर अशा बलस्थानांचा आणि समाजाच्या गरजांचा कल्पकतेने मेळ घालून वर्षानुवर्षे न सुटलेले समाजाचे जटील प्रश्न कसे सोडवता येतात, त्यात सर्व स्टेकहोल्डर्सचा मन:पूर्वक सहभाग कसा मिळवता येतो, मूल्यवर्धन साधणाऱ्या रोजगारांची निर्मितीही कशी करता येते हे पानसेसरांच्या या आणि अशा इतर भन्नाट प्रकल्पांमधून कार्यकर्त्यांनी आणि धोरणकर्त्यांनीही शिकायला हवे.

सरांनी बालशिक्षणावर केवळ व्याख्यानेच दिली असे नाही, तर अतिशय विस्तृत लेखनही सातत्याने चाळीस वर्षे केले आणि त्याचबरोबर सर्वात महत्त्वाचे म्हणजे शोषित, वंचित, पीडित, दुर्लक्षित, गरीब आणि अलिकडे बेदखल होत असलेला जो आदिवासी वर्ग आहे त्या वर्गाच्या मुलांना कमीत कमी खर्चामध्ये उत्कृष्ट गुणवत्तेचे बालशिक्षण कसे देता येते हे यशस्वीरित्या महाराष्ट्राला दाखवून दिले. पानसेसरांची संशोधक वृत्ती, त्यांची चिंतनशीलता, वैचारिक मांडणीची हातोटी आणि विशेषतः त्यांची प्रयोगशीलता अत्यंत प्रेरणादायी आहे. पानसेसरांनी बालशिक्षणासाठी अभ्यासूवृत्तीने केवळ संशोधन कार्य केले असे नव्हे तर लोकसंवाद, लोकसेवा, शिक्षण, प्रशिक्षण, जागृती, प्रबोधन, सिद्धांतन, युक्तीवाद, चर्चा, तत्वचिंतन, लेखन, नवप्रवर्तन, संघटन, संस्था-संचालन या सर्वांबरोबरच पानसेसरांनी वेळ येताच अटीतटीचा संघर्षही केला. इतका संवेदनशील व कृतिशील विचारवंत बालशिक्षणाच्या

क्षेत्रातील महाराष्ट्रातील परंपरा समृद्ध करण्यासाठी आपल्याला लाभला हे आपले अहोभाग्य आहे. प्राध्यापक रमेश पानसे यांचे वर्णन त्यामुळेच ‘‘बालशिक्षणमहर्षी’’ असे करणे सर्वार्थाने उचित ठरेल.

पानसेसरांच्या कार्याची व्याप्ती मोठी असली तरी त्याची खोली त्यांच्या ग्रंथप्रेमामुळे व व्यासंगामुळे निर्माण झाली आहे. आजपर्यंतच्या जवळजवळ सर्व पाश्चात्य व पौर्वात्य शिक्षणतज्ज्ञांच्या विचारांचे व कार्याचे सखोल परिशीलन आपल्याला त्यांच्या ग्रंथांमधून वाचायला मिळते. ‘बिल्ट ऑफ बुक्स: हाउ रीडिंग डिफाईन्ड द लाईफ ऑफ ऑस्कर वाईल्ड’ हे थॉमस राईटने लिहिलेले वाईल्डचे चरित्र प्रसिद्ध आहे. तसेच ‘ग्रंथांनी रचलेला महापुरुष’ हा डॉ. आनंद पाटील यांनी लिहिलेला यशवंतराव चव्हाण यांच्यावरील एक आगळावेगळा चरित्रग्रंथ आहे. पानसेसर हा सुद्धा असाच एक ‘ग्रंथांनी रचलेला बालशिक्षणमहर्षी’ आहे असे मला वाटते. त्यांचे लेखन आणि कार्य अभ्यासताना जगातील इतक्या लेखकांचे, ग्रंथांचे, संशोधनांचे जे संदर्भ येतात त्यावरून हे वर्णन किती सार्थ आहे हे कोणासही पटेल. ‘ग्रंथांनी रचलेला माणूस’ हे पानसेसरांचे वर्णन पुरेसे मात्र नाही. ते स्वत: पन्नासपेक्षा जास्त ग्रंथांचे कर्तेही आहेत. बालशिक्षणातून मानवतावाद जोपासण्याची ती त्यांची अखंड तपश्चर्या आहे. ग्रंथांनी रचलेल्या आणि ग्रंथ रचणाऱ्या पानसेसरांवर ग्रंथ रचलेही गेले आहेत, हे विशेष. आपल्या पतीवर ग्रंथ रचावा असे जगातल्या फारच थोड्या स्त्रियांना वाटले आहे. त्यात त्याच्याविषयी सकारात्मक लिहावे असे त्याहीपेक्षा थोड्यांना वाटले आहे! पानसेसर अशा भाग्यवान व ‘स्फूर्तीदायी’ पतींपैकी एक आहेत व आता त्यांच्या शिक्षणविचारावर व कार्यावर त्यांच्या दोन शिष्यसदृश विदुषींनी दोन स्वतंत्र ग्रंथ रचले आहेत. लवकरच ते प्रकाशित होणार आहेत. त्यामुळे पानसेसर हा ‘ग्रंथांनी रचलेला, ग्रंथ रचत राहिलेला आणि ज्याच्यावर ग्रंथ रचवेसे वाटतात, रचले जातात व जातील’ असा ज्ञानोपासनेत रममाण असलेला ‘ग्रंथमानव’ आहे! पुढील काळात  यंत्रमानवांच्या वाढत्या नियंत्रणातून मुक्ती मिळविण्यासाठी मानवाला कदाचित पानसेसरांसारखे द्रष्टे ‘ग्रंथमानव’च साथ देतील.

पानसेसरांना त्यांच्या ऐंशीव्या वाढदिवसानिमित्त माझे विनम्र अभिवादन आणि त्यांच्या पुढील कार्याला माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा.

विवेक सावंत
१ जून २०२०